मौजा पिपळा खसरा क्रमांक १५४/२, १५४/३, तह. नागपूर ग्रा.

# नागपूर सुधार प्रन्यास
## मेट्रो विभाग

नागपूर सुधार प्रन्यास सास्कृतिक कुल, तिसरा माळा, उत्तर अंबाझरी मार्ग, नागपूर-४४० ०३३

क्रमांक : का.अभि.(मेट्रो)/स.अभि.–१/ ६५५ नागपूर, दिनांक : ९/०३/२०१६.

प्रति,

मा. जिल्हाधिकारी,
नागपूर.

**विषय :–** मौजा पिपळा खसरा क्रमांक १५४/२, १५४/३, आराजी १.६२ हे.आर. प.ह.नं. ३८, तह. नागपूर (ग्रामीण), जि. नागपूर जागेस निवासी वापरास अकृषक करनिर्धारण करण्याबाबत.

**संदर्भ :–**
१. अर्जदाराचा दिनांक १४.०१.२०१५ रोजीचा अर्ज.
२. शासन निर्णय क्र. एनएपी.-२०१६/म.प्र.७/टी–१, दि. २२/०१/२०१६
३. अकृषिक आदेश पत्र क्र. स्तुत/जिल्हाधिकारी/कावि–९२३/२०१२, रा.भा क्र. ५१/एन.ए.पी.– ३४/२०१२–२०१३, दिनांक ११/०९/२०१२

महोदय,

विषयांकित प्रकरणातील जागा **निवासी वापरार्थ** अकृषक करणेप्रकरणी अभिन्यास मंजूरीचे प्रकरण संदर्भांकित अर्जान्वये प्राप्त झाले आहे.

अंतिम प्रादेशिक योजना नागपूर प्रदेशच्या प्रावधानानुसार उक्त जागा पश्चिम प्रभागात समाविष्ट असून मंजूर प्रादेशिक योजनेत कृषी व राष्ट्रीय उद्यान या उपयोगाने प्रस्तावित आहे. परंतु दिनांक ६८/०८/२०१० च्या शासन निर्णयानुसार सदर जागा "निवासी" उपयोगाने प्रस्तावित आहे. तसेच नागपूर महानगर क्षेत्राकरिता दिनांक २०/०२/२०१५ ला प्रसिध्द झालेल्या प्रारूप विकास योजनेत उक्त जागा निवासी--२ व २४.० मी. रूंद रस्ता या उपयोगाने प्रस्तावित आहे. शासन पत्र दिनांक ११/०१/२०१६ नुसार तात्पुरते मंजूर रेखांकने अशा विकास प्रस्तावा पूर्व बांधलकी म्हणून पुढील प्रक्रियेसाठी क्रम प्राप्त राहील.

सदर्भाधिन पत्रासोबत या कार्यालयास प्राप्त झालेल्या प्रकरणाच्या अभिन्यासाला मा. सभापती नागपूर सुधार प्रन्यास यांनी दिनांक **१९.०३.२०१६** रोजी **अंतिम मंजूरी** प्रदान केलेली आहे. उक्त जागेला फक्त **निवासी** वापराकरीता अकृषक करनिर्धारण करण्याकरीत. **अंतिम मंजुरीची** खालील अटींवर शिफारस करण्यात येत आहे.

१. अभिन्यासातील भूखंडाचा उपयोग फक्त "**निवासी**" वापराकरिताच करण्यात यावा.
२. सभोवतालचे मंजूर अभिन्यासातील रस्त्यांशी योग्यरितीने समन्वय साधणे आवश्यक आहे.
३. अभिन्यासाची जागेवरील प्रत्यक्ष आखणी केल्यानंतर अभिन्यासातील राखून ठेवलेल्या खुल्या जागेचे क्षेत्रफळ अभिन्यासातील जागेच्या एकूण क्षेत्रफळाच्या १०% पेक्षा कमी असु नये.
४. "सार्वजनिक सोयी व सुविधा" करिता प्रस्तावित केलेल्या भूखंडाचे क्षेत्रफळ एकुण क्षेत्रफळाच्या १०% पेक्षा कमी असु नयें.
५. अभिन्यासातील जागेत काही वृक्ष असल्यास, भूखंड आखतांना ते नष्ट न करता विद्यमान स्थितीत कायम ठेवावीत.
६. विषयांकित जमिनीतून विद्युत वाहिनी/दुरध्वनी वाहिनी जात असल्यास उक्त वाहिनी प्रस्तावाला बाधित होणार नाही अशा रितीने संबंधीत विभागाच्या अधिनियम नियमानुसार आवश्यक त्या सामासिक अंतरावर स्थानांतरीत करावी लागेल.
७. सदर रेखांकनामधील प्रस्तावित बांधकामास त्यावेळी प्रचलित असलेली विकास नियंत्रण नियमावली लागू राहील.

नगम–७ ४६२/२०१७ ९५/२६

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR CLASS-2 NAGPUR RURAL NO.7

Scanned with CamScanner

८. विषयांकित जागेलगत/जागेतून पाण्याचे स्त्रोत जात असल्यास संबंधित पाटबंधारे/जलसिंचन विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र घ्यावे लागेल.

९. पावसाच्या पाण्याचे जलसंवर्धन (Rain Water Harvesting) ची व्यवस्था अभिन्यासात करावी लागेल.

१० अभिन्यासातील रस्ते योग्य प्रकारे विकसीत करून संबधित ग्रामपंचायतीस नियमानुसार हस्तांतरीत करावे लागतील.

११. जमीनीचे मालकी हक्काबाबत महसूल विभागाचे स्तरावर खात्री करून घेणे आवश्यक राहील.

१२. अभिन्यासात सार्वजनिक पाणी पुरवठयाची व्यवस्था जमिन मालक/विकासक यांनी स्वत:चे खर्चाने करणे आवश्यक राहील. अभिन्यासात निर्माण होणाऱ्या सांडपाण्याचा (*Black & Grey Water*) पुनर्वापर करण्यासाठी (बगीचा, लॅन्ड स्केपिंग, फिशींग, फिश पॉड, रस्ते सफाई, संडास व मुतारीत उपयोगासाठी व धुण्यासाठी) नासुप्रच्या विश्वस्त मंडळाच्या ठराव क्र. २७/१०९२ च्या प्रावधानांनुसार सांडपाणी व सांडपाण्याची प्रक्रीया करून विल्हेवाट करण्याची व्यवस्था जमिन मालक/विकासक यांनी स्वत:चे खर्चाने करणे आवश्यक राहील.

१३. दिनांक २१/११/२०१३ रोजी मंजूर प्रादेशिक विकास योजनेच्या विकास नियंत्रण नियमावलीतील २४.१ या तरतूदीनुसार सदर जागेवरील अभिन्यासातील २४.० मी. रूंदीकरणा खालील रस्ता विशेष नियोजन प्राधिकरणास विनामुल्य हस्तांतरीत करावी लागेल. तदनंतर भूमी अभिलेखात प्राधिकरण / जिल्हाधिकारी यांचे नावे हस्तांतरीत करावी लागेल. उक्त प्रकियेनंतर सदर्हू जागा सार्वजनिक रस्त्याचा भाग होईल व मंजूर प्रादेशिक विकास योजनेच्या विकास नियंत्रण नियमावलीतील २४.१ या तरतूदीनुसार F.S.I. अनुज्ञेय होईल.

१४. सुधारित आखणीची 'क' प्रत प्राप्त झाल्यावर नागपूर सुधार प्रन्यास सोबत विकास करारनामा करणे बंधनकारक राहील.

१५. विषयांकित जागेवर बांधकाम सुरू करण्यापूर्वी बांधकाम नकाशे विशेष नियोजन प्राधिकरण कडून मंजूर करून घ्यावे लागेल.

अभिन्यासाची दोन प्रत या कार्यालयामार्फत यासह पाठविण्यात येत आहेत. कृपया उक्त जागेची अकृषक करनिर्धारण प्राप्त झाल्यानंतर अकृषक आदेशाची प्रत या कार्यालयास पाठविण्यात यावी, ही विनंती.

सहपत्र : १. अभिन्यास नकाशा दोन प्रत

S. P. P.
कार्यकारी अभियंता (मेट्रो)
नागपूर सुधार प्रन्यास


प्रतिलिपी :

१. तहसिलदार, तहसील कार्यालय नागपूर (ग्रामीण), सिव्हील लाईन्स, नागपूर.
२. श्री मनोज बाबुराव सुरमवार व इतर, रा. शॉप क्र. ६, शुभम टॉवर पहिला माळा, अजनी, वर्धा रोड, नागपूर–४४००२५

नगन–७
४७२/२०१७
पृ. ४६

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR, CLASS-2, NAGPUR RURAL NO.7
सह दुय्यम निबंधक, वर्ग-२, नागपूर ग्रामीण क्र. ७

Scanned with CamScanner




This layout plan ... Hon'ble Chairman ...

| PLOT. NO | | | | PLOT SIZE | |
|---|---|---|---|---|---|
| | A | | | B | |
| 1 | 0.50 X | 29.918 | + | 32.787 | 31.353 |
| 2 | 0.50 X | 33.425 | + | 31.917 | 32.671 |
| 3 | 0.50 X | 33.468 | + | 35.049 | 34.259 |
| 4 | 0.50 X | 22.577 | + | 23.794 | 23.186 |
| 5 | 0.50 X | 25.750 | + | 27.495 | 26.623 |
| 6 | 0.50 X | 28.808 | + | 29.279 | 29.044 |
| | | | | | TOTAL |

SIZE

A 1/2 X 24.854 -

SIZE

B 1/2 X 14.047 -
C 1/2 X 22.203 -
D 1/2 X -

ARE

SIZE

E 1/2 X 5.939 -

नगन - ७
४७२ | २०१७
१६ | २६

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR, CLASS-2, NAGPUR RURAL NO. 7 सह दुय्यम निबंधक, वर्ग-२, नागपुर ग्रामीण क्र. ७

Scanned with CamScanner